## आजचे पंचांग

बुधवार- दि. १३ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, कृष्णपक्ष, एकादशी दुपारी १-३० पर्यंत नंतर द्वादशी तिथी, दिवस नक्षत्र–उ. भा. रात्री १२-१८ पर्यंत नंतर रेवती
चंद्र रास - मीन, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन



दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


## उन्हाच्या तीव्र झळा

**मुंबई**: सध्या संपूर्ण राज्यात निसर्गाचे दोन टोकाचे रूप पाहायला मिळत आहे. काही भागांत पावसाची हजेरी असतानाच, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात कडाक्याचे ऊन पडत आहे. हवामान विभागाने या भागांसाठी 'येलो अलर्ट' जारी केला आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत सूर्याची तीव्रता सर्वाधिक असल्याने, अतिशय महत्त्वाच्या कामाशिवाय घराबाहेर पडू नका, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. उन्हाच्या झळा इतक्या तीव्र आहेत की, आरोग्याची विशेष काळजी घेणे आता अनिवार्य झाले आहे.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. १३ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २२७ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


## सारांश वृत्त

### नेपाळमध्ये बस कोसळून ४ प्रवाशांचा मृत्यू

**काठमांडू** : नेपाळच्या अर्घाखाची जिल्ह्यात बस कोसळून झालेल्या अपघातात चार प्रवाशांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. अर्घाखाची येथील सुपा देउराली मंदिरात पूजा करून यात्रेकरू पर्वत जिल्ह्यातील मोदी नगरपालिकेत परतत असताना पाणिनी ग्रामपालिका परिसरात हा अपघात झाला. माहितीनुसार, ब्रेक निकामी झाल्यानंतर बस डोंगराळ रस्त्यावरून सुमारे १०० मीटर खाली कोसळली.

### ब्रिक्सच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक

**नवी दिल्ली :** भारताने गुरुवारपासून आयोजित केलेल्या ब्रिक्स देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या दोन दिवसीय बैठकीत पश्चिम आशियातील वाढती पेच आणि त्याचा जागतिक ऊर्जा पुरवठा साखळीवर होणारा परिणाम यावर चर्चा होण्याची शक्यता आहे. तेहरानने परराष्ट्रमंत्री अब्बास अरागची यांच्या उपस्थितीची पुष्टी केली आहे, परंतु प्रादेशिक संघर्षात अचानक वाढ झाल्यास त्यांच्या योजनांमध्ये बदल होऊ शकतात. चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी हे अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांच्या दौऱ्यामुळे नवी दिल्ली परिषदेला गैरहजर राहणार आहेत.

### रेशन भ्रष्टाचारावर कठोर कारवाई होणार

**कोलकाता** : पश्चिम बंगालचे अन्न व पुरवठा मंत्री अशोक किर्तानिया यांनी मंगळवारी विभागातील भ्रष्टाचारावर कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'ना खाउंगा, ना खाने दुंगा' या वारंवार केलेल्या घोषणेचा उच्चार करत ते म्हणाले की, ते भ्रष्टाचारात सहभागी होणार नाहीत किंवा इतर कोणालाही तसे करू देणार नाहीत.

भारताची कठोर शब्दांत टीका; परराष्ट्र मंत्रालयाने दिला दुजोरा

# ‘ऑपरेशन सिंदूर’वेळी पाकला चीनची मदत

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : ‘ऑपरेशन सिंदूर’ दरम्यान पाकिस्तानला चीनकडून तांत्रिक आणि रणनीतिक मदत मिळाल्याच्या वृत्तांना भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने प्रथमच अधिकृत दुजोरा दिला आहे. मे २०२५ मध्ये भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या प्रत्युत्तरात राबवलेल्या या कारवाईदरम्यान चीनने पाकिस्तानला सहाय्य केल्याचे अहवाल समोर आले होते. आता हे सर्व अहवाल वास्तवाशी सुसंगत असल्याचे स्पष्ट करत भारताने चीनवर अप्रत्यक्ष पण अत्यंत कठोर शब्दांत निशाणा साधला आहे.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले की, चीनच्या मदतीसंदर्भातील माहिती भारत सरकारला आधीपासूनच उपलब्ध होती. अलीकडे चीनच्या सरकारी माध्यमांतूनही या बाबीची कबुली देण्यात आली असून, नव्याने समोर आलेले अहवाल केवळ त्या माहितीवर शिक्कामोर्तब करणारे आहेत.

‘ऑपरेशन सिंदूर’ ही भारताने अत्यंत अचूक आणि नियोजनबद्ध पद्धतीने केलेली कारवाई होती. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानातील दहशतवादी तळ आणि पायाभूत संरचना लक्ष्य करत भारताने ही मोहीम राबवली होती. भारतीय सुरक्षा यंत्रणांनी या कारवाईत सीमापार कार्यरत दहशतवादी नेटवर्कला मोठा फटका दिल्याचा दावा केला होता.

चीनच्या भूमिकेवर बोलताना जयस्वाल यांनी कोणतेही नाव न घेता थेट टीका केली. “जे देश स्वतःला जबाबदार जागतिक शक्ती मानतात, त्यांनी दहशतवादाला संरक्षण देणाऱ्या शक्तींना पाठिंबा दिल्यास त्याचा स्वतःच्या विश्वासार्हतेवर काय परिणाम होतो, याचा विचार करायला हवा,” असे ते म्हणाले. दहशतवादी पायाभूत सुविधांचे संरक्षण करणाऱ्या देशांच्या भूमिकेवर जगभरात प्रश्न उपस्थित होणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

या पत्रकार परिषदेत पश्चिम आशियातील तणावपूर्ण परिस्थितीचाही आढावा घेण्यात आला. ‘हॉर्मुझची सामुद्रधुनी’मधील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या सागरी सुरक्षेबाबत माहिती देताना मंत्रालयाने सांगितले की, त्या मार्गातून ११ भारतीय जहाजे सुरक्षितपणे बाहेर पडली आहेत. मात्र, अजूनही १३ भारतीय जहाजे पर्शियन आखात परिसरात असून परिस्थिती सामान्य होण्याची प्रतीक्षा करत आहेत. भारत सरकार या जहाजांच्या सुरक्षेवर सातत्याने लक्ष ठेवून असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

बांगलादेशातील राजकीय घडामोडींवर प्रतिक्रिया देताना भारताने दोन्ही देशांतील संबंध सकारात्मक दिशेने पुढे जात असल्याचे सांगितले. बांगलादेशच्या नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्यात भारताच्या प्रतिनिधींचा सहभाग आणि दोन्ही देशांतील वाढता संवाद याचा उल्लेख करत भारताने शेजारी राष्ट्रासोबतचे संबंध अधिक मजबूत करण्याची भूमिका स्पष्ट केली. याशिवाय भारत-नेपाळ संबंधांबाबतही सकारात्मक संकेत देण्यात आले.

## सोने-चांदी आणि खाद्यपदार्थ महागले
## किरकोळ महागाई ३.४८ टक्क्यांवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : देशातील किरकोळ महागाईदरात एप्रिल महिन्यात पुन्हा वाढ नोंदवली गेली असून ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई ३.४८ टक्क्यांवर पोहोचली आहे. सरकारी आकडेवारीनुसार, हा महागाईदर गेल्या १३ महिन्यांतील उच्चांक मानला जात आहे. सोने-चांदीचे दागिने, भाजीपाला आणि काही जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींमध्ये झालेल्या वाढीमुळे महागाईचा दबाव वाढल्याचे स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, मार्च महिन्यात महागाई दर ३.४० टक्के होता. त्याआधी फेब्रुवारीमध्ये तो ३.२१ टक्के, तर जानेवारीमध्ये २.७४ टक्के इतका नोंदवला गेला होता. २०२४ हे आधारभूत वर्ष मानून ही आकडेवारी मोजण्यात आली आहे. शहरी भागातील महागाई दर मार्चमधील ३.११ टक्क्यांवरून एप्रिलमध्ये ३.१६ टक्क्यांवर पोहोचला. तर ग्रामीण भागात महागाईचा दबाव अधिक दिसून आला असून ग्रामीण महागाई दर ३.६३ टक्क्यांवरून ३.७४ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. ग्रामीण भागातील अन्नधान्य आणि दैनंदिन वस्तूंच्या किमतींमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे स्पष्ट होत आहे. अन्नधान्य गटातील महागाईही वाढली असून एप्रिलमध्ये ती ४.२० टक्क्यांवर नोंदवली गेली. मार्चमध्ये हा दर ३.८७ टक्के होता. भाज्या, खाद्यपदार्थ आणि धान्यांच्या वाढलेल्या किमतींचा यामध्ये मोठा वाटा असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

महागाईत सर्वाधिक वाढ चांदीच्या दागिन्यांमध्ये दिसून आली. चांदीच्या दागिन्यांच्या किमतींमध्ये तब्बल १४४.३४ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे.

## शरद पवार सुनील तटकरे यांची सिल्व्हर ओकवर भेट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मंगळवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची त्यांच्या ‘सिल्व्हर ओक’ या निवासस्थानी भेट घेतल्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनात्मक बदलांच्या पार्श्वभूमीवर आणि पक्षांतर्गत नाराजीच्या चर्चांदरम्यान ही भेट झाल्याने तिच्याकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे.

अजित पवार गटाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या भूमिकेबाबत चर्चांना उधाण आले होते. काही वृत्तांमध्ये त्यांचे महत्त्व कमी झाल्याचे म्हटले जात असताना, तटकरे यांनी थेट सिल्व्हर ओक गाठल्याने राजकीय चर्चांना आणखी वेग आला आहे.


सुनील तटकरे हे गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांच्या भेटीसाठी वेळ मागत होते. मात्र शरद पवार यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे ही भेट लांबणीवर पडत होती. अखेर मंगळवारी ती मिळाल्यानंतर तटकरे सिल्व्हर ओकवर पोहोचले. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांच्या शपथविधी सोहळ्यासाठी ते गुवाहाटीला गेले होते. तेथून परतल्यानंतर त्यांनी शरद पवार यांची भेट घेतली. त्यामुळे या भेटीमागे नेमका राजकीय संदेश काय, याबाबत विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत.

१० लाखांत पेपर खरेदी, १५ लाखांत विक्रीचा संशय

# नीट पेपरफुटी प्रकरणात नाशिक कनेक्शन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक** : देशातील वैद्यकीय प्रवेशासाठी महत्त्वाची मानली जाणारी नीट परीक्षा पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. ३ मे रोजी झालेल्या नीट २०२६ परीक्षेचा पेपर फुटल्याचा संशय बळावल्याने परीक्षा रद्द करण्यात आली असून संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीचे आदेश सीबीआयला देण्यात आले आहेत. दरम्यान, या प्रकरणात मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून या घोटाळ्याचे नाशिक कनेक्शन उघड झाले आहे.





नाशिक पोलिसांनी शुभम खैरनार नावाच्या संशयित आरोपीला ताब्यात घेतले आहे. तो नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्याचा रहिवासी असून त्याची मेडिकल काऊन्सिलिंग एजन्सी असल्याची माहिती तपासात समोर आली आहे. पोलिसांनी त्याचा मोबाईल नंबर, पत्ता आणि इतर तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेत कारवाई केली. पेपरफुटीनंतर पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी आरोपीने स्वतःची हेअरस्टाईल बदलल्याचेही तपासात उघड झाले आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नाशिकमधील आरोपीने अहिल्यानगरमधील एका व्यक्तीकडून तब्बल १० लाख रुपयांत प्रश्नपत्रिका विकत घेतली होती. त्यानंतर हीच प्रश्नपत्रिका हरियाणातील आरोपीला १५ लाख रुपयांत विकल्याचा संशय तपास यंत्रणांना आहे. या व्यवहारातून लाखो रुपयांची आर्थिक देवाणघेवाण झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राजस्थानमध्ये परीक्षेच्या एक दिवस आधी एक तथाकथित ‘गेस पेपर’ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या प्रश्नसंचातील तब्बल १२५ प्रश्न प्रत्यक्ष नीट परीक्षेत आल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेषतः फिजिक्स आणि बायोलॉजी विषयांतील अनेक प्रश्न जुळल्याने संशय अधिक बळावला. परीक्षेच्या दिवशीच राजस्थानमधील सीकर येथे विद्यार्थ्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पुराव्यांसह नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडे धाव घेतली.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत एनटीएने राजस्थानच्या पोलीस महासंचालकांना पत्र पाठवले. त्यानंतर राजस्थान पोलिसांच्या स्पेशल ऑपरेशन्स ग्रुपने चौकशी सुरू केली. विद्यार्थ्यांच्या मोबाईल चॅट्स, व्यवहार आणि इतर डिजिटल पुराव्यांची तपासणी सुरू आहे. मात्र प्रश्नपत्रिका नेमकी कुठून आणि कशी लीक झाली, याचे उत्तर अद्याप स्पष्ट झालेले नाही.

दरम्यान, एनटीएने ३ मे रोजी झालेली परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. देशभरातील सुमारे २२ लाख विद्यार्थ्यांना याचा फटका बसणार असून महाराष्ट्रातील जवळपास अडीच लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे. परीक्षा पुन्हा घेतली जाणार असून नवीन तारीख लवकरच जाहीर केली जाणार आहे. विद्यार्थ्यांना पुन्हा नोंदणी करण्याची आवश्यकता नसून कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. नव्याने प्रवेशपत्र जारी करण्यात येणार असून विद्यार्थ्यांना पूर्वीच्या केंद्रांवरच परीक्षा द्यावी लागणार आहे.

निदा खान प्रकरणी मतीन पटेल यांना दिलासा नाही

# अतिक्रमण कारवाई रोखण्यास न्यायालयाचा नकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**छत्रपती संभाजीनगर** : निदा खान प्रकरणावरून छत्रपती संभाजीनगरचे राजकारण पुन्हा तापले असून मतीन पटेल यांना न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. अनधिकृत बांधकामावरील महापालिकेची कारवाई रोखण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने कोणताही दिलासा देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे मतीन पटेल यांच्या घरावर आणि कार्यालयावर कोणत्याही क्षणी कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



नाशिक धर्मांतर प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याचा आरोप मतीन पटेल यांच्यावर करण्यात आला आहे. या प्रकरणात नाशिक पोलिसांनी त्यांच्याविरोधात सहआरोपी म्हणून गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्या घर आणि कार्यालयाला अनधिकृत बांधकामाबाबत नोटीस बजावली होती.

महापालिकेने दिलेली तीन दिवसांची नोटीस बेकायदेशीर असल्याचा दावा करत मतीन पटेल यांनी औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली होती. त्यांनी खुलासा सादर करण्यासाठी १५ दिवसांची मुदत मागितली होती. मात्र न्यायालयाने अतिक्रमण कारवाईला स्थगिती देण्यास नकार दिला. त्यामुळे प्रशासनाचा मार्ग मोकळा झाल्याचे मानले जात आहे. महापालिकेकडून मतीन पटेल यांच्या नारेगाव परिसरातील राहत्या घरासह कार्यालयालाही नोटीस बजावण्यात आली आहे. संबंधित बांधकामे अनधिकृत असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. त्यामुळे आता महापालिकेकडून बुलडोझर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अंतिम निर्णय प्रशासन घेणार असला, तरी न्यायालयीन दिलासा न मिळाल्याने मतीन पटेल यांच्या अडचणी वाढल्या आहेत. मतीन पटेल हे ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षात गेल्या अनेक वर्षांपासून सक्रिय असून माजी खासदार इम्तियाज जलील यांचे निकटवर्तीय मानले जातात. निदा खानच्या अटकेनंतर या प्रकरणाने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवली आहे.

### आदिवासींच्या शिक्षणाला चालना

**मुंबई :** आदिवासीबहुल भागांतील विद्यापीठांमध्ये आदिवासी अध्ययन, संशोधन आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी ‘आदिवासी अध्यासन केंद्र’ सुरू करण्यात येणार आहेत. या उपक्रमामुळे आदिवासी विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध होणार असून आदिवासी समाजाच्या इतिहास, संस्कृती आणि परंपरांच्या संशोधनाला नवी दिशा मिळणार आहे, असे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासी अध्यासन केंद्रांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

# पोलीस गृहनिर्माण योजनेला गती

### ५ हजार ४५९ पोलिसांच्या घरांसाठी १,७६८ कोटी मंजूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हक्काचे घर मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१७ मध्ये सुरू केलेल्या पोलीस गृहनिर्माण व्याजसवलत अनुदान योजनेला पुन्हा गती मिळाली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात बंद करण्यात आलेली ही योजना पुन्हा सुरू करत सरकारने ५ हजार ४५९ पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या घरांसाठी तब्बल १ हजार ७६८.०८ कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी दिली आहे.

गृह विभागाने मंगळवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. या निर्णयानुसार पात्र पोलीस कर्मचाऱ्यांना बँकांमार्फत घरबांधणी कर्ज उपलब्ध करून दिले जाणार असून त्या कर्जावरील व्याजाचा संपूर्ण भार राज्य सरकार उचलणार आहे. यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्यात आली असून महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत हा निधी वितरित केला जाणार आहे.

प्रलंबित अर्जांपैकी ५ हजार ४५९ पात्र पोलीस कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार असून बँकांनी मंजूर केलेल्या कर्जाच्या प्रमाणात टप्प्याटप्प्याने निधी उपलब्ध करून दिला जाईल. त्यामुळे घराच्या प्रतीक्षेत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जनतेच्या सुरक्षेसाठी दिवस-रात्र काम करणाऱ्या पोलिसांना स्वतःचे घर मिळाले पाहिजे, यासाठी मी सुरुवातीपासून आग्रही आहे. २०१४ ते २०१९ या काळात मोठ्या प्रमाणात पोलिसांसाठी व्याजसवलत अनुदान योजना राबवण्यात आली होती. मात्र आघाडीच्या काळात ही योजना बंद करण्यात आली. आता आम्ही ती पुन्हा सुरू केली आहे, असे त्यांनी सांगितले.

तीन उद्योग समूहांना रिक्वेस्ट फॉर प्रपोजल मिळणार?

# भारताच्या पाचव्या पिढीच्या स्टेल्थ फायटर प्रकल्पाला वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारताच्या महत्त्वाकांक्षी पाचव्या पिढीच्या स्टेल्थ लढाऊ विमान प्रकल्पाला आता निर्णायक गती मिळणार आहे. ‘अ‍ॅडव्हान्स्ड मीडियम कॉम्बॅट एअरक्राफ्ट’ (एएमसीए) या स्वदेशी स्टेल्थ फायटर कार्यक्रमासाठी केंद्र सरकार पुढील महिन्यात खासगी क्षेत्राच्या नेतृत्वाखालील तीन उद्योग समूहांना ‘रिक्वेस्ट फॉर प्रपोजल’ (आरएफपी) जारी करण्याच्या तयारीत आहे. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांनी मंगळवारी ही माहिती दिली. राजधानी दिल्लीत आयोजित ‘जिओस्ट्रॅटेजी, सप्लाय चेन्स





अँड स्ट्रॅटेजिक रेझिलियन्स’ या कार्यक्रमात बोलताना त्यांनी सांगितले की, एएमसीए प्रकल्पासाठी निवड प्रक्रियेत आता तीन उद्योग समूह अंतिम टप्प्यात पोहोचले आहेत. या प्रक्रियेमुळे भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात खासगी उद्योगांची भूमिका अधिक मजबूत होणार असून भविष्यात मोठा स्वदेशी एरोस्पेस उद्योग उभा राहण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. संरक्षण सचिवांनी स्पष्ट केले की, या तीन स्पर्धक उद्योग समूहांपैकी दोन समूह हे सार्वजनिक आणि खासगी क्षेत्राच्या भागीदारीवर आधारित आहेत, तर एक समूह पूर्णपणे खासगी स्वरूपाचा आहे. पुढील महिन्यात किंवा त्यानंतर या कंपन्यांना अधिकृत आरएफपी जारी केले जातील. यानंतर संबंधित कंपन्या लढाऊ विमानाच्या विकास आणि उत्पादनासाठी सविस्तर तांत्रिक व आर्थिक प्रस्ताव सादर करतील. या स्पर्धेत लार्सन अँड टुब्रो हे भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड आणि डायनामॅटिक टेक्नॉलॉजीज यांच्या भागीदारीत उतरले आहेत. दुसरीकडे टाटा अ‍ॅडव्हान्स्ड सिस्टिम्स लिमिटेड स्वतंत्रपणे स्पर्धेत आहे. तर भारत फोर्जने बीईएमएल आणि डेटा पॅटर्न्स यांच्यासोबत भागीदारी केली आहे. संरक्षण मंत्रालयाला या प्रक्रियेमुळे हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड व्यतिरिक्त आणखी एक मोठी लढाऊ विमान उत्पादन व्यवस्था उभी राहील, अशी अपेक्षा आहे. दरम्यान, एएमसीए प्रकल्पाच्या आर्थिक मूल्यमापन टप्प्यात हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडला बाहेर पडावे लागल्याची माहिती समोर आली आहे. एचएएलकडे आधीच प्रचंड ऑर्डर बुक असून त्याची वार्षिक उलाढाल जवळपास आठपट असल्यामुळे अतिरिक्त उच्च-जोखीम प्रकल्प हाताळण्याच्या क्षमतेबाबत प्रश्न उपस्थित झाले होते. त्याचवेळी एचएएलकडून तेजस एमके-1ए लढाऊ विमानांच्या पुरवठ्यात दोन वर्षांचा विलंब झाल्यानेही सरकार सावध झाल्याचे मानले जात आहे. अंतिम निवड ‘एल-१’ अर्थात सर्वात कमी खर्चाच्या निकषावर होण्याची शक्यता आहे. तांत्रिक पात्रता पूर्ण करणाऱ्या कंपन्यांपैकी सर्वात कमी आर्थिक प्रस्ताव देणाऱ्या समूहाला प्राधान्य दिले जाईल. भारतातील पारंपरिक क्षेपणास्त्र उत्पादन प्रामुख्याने भारत डायनॅमिक्स लिमिटेड या सरकारी कंपनीकडे केंद्रित आहे. मात्र बदलत्या युद्धतंत्राच्या पार्श्वभूमीवर विविध प्रकारच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांसाठी खासगी क्षेत्राला तंत्रज्ञान हस्तांतरण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## रूपाली चाकणकर यांच्या अडचणींमध्ये वाढ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नाशिक** : नाशिकमधील कथित भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाने आता आणखी गंभीर वळण घेतले असून, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विशेष तपास पथकाच्या चौकशीनंतर आता अंमलबजावणी संचालनालयाने देखील या प्रकरणात हालचाली सुरू केल्या असून, चाकणकर यांना समन्स बजावण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

अशोक खरात याच्यावर मोठ्या प्रमाणात खंडणी उकळल्याचे आणि आर्थिक गैरव्यवहार केल्याचे गंभीर आरोप आहेत. तपास यंत्रणांच्या प्राथमिक माहितीनुसार, या कथित रॅकेटमधून तब्बल ७० कोटी रुपयांहून अधिक आर्थिक उलाढाल झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या पैशांची देवाणघेवाण लपवण्यासाठी अनेक बेनामी बँक खात्यांचा वापर करण्यात आल्याचेही तपासात पुढे आले आहे.

या आर्थिक व्यवहारांशी संबंधित काही धागेदोरे रूपाली चाकणकर यांच्यापर्यंत पोहोचल्याने तपास यंत्रणांनी त्यांच्याकडे लक्ष केंद्रीत केले आहे. विशेष तपास पथकाने नाशिकमध्ये त्यांची तब्बल साडेपाच तास चौकशी केली होती. विविध आर्थिक कागदपत्रे, संस्थांशी संबंधित नोंदी आणि संपर्कांची माहिती अधिकाऱ्यांनी तपासल्याची माहिती समोर आली आहे.

## संपादकीय

# तिजोरीने गाठलेला तळ आणि अगतिकतेची भिंत




**परकीय चलनाचा साठा म्हणजे तिजोरीतील आकडे नसून, तो देशाच्या जागतिक पतप्रतिष्ठेचा आरसा असतो आणि जेव्हा आयातीवर कात्री लावण्याची अगतिकता निर्माण होते, तेव्हा व्यवस्थेतील जुनाट व्याधींवर पुन्हा एकदा गंभीरपणे विचार करणे अपरिहार्य ठरते.**

भारतीय अर्थकारणाच्या इतिहासात १९९१ सालचा तो काळ आजही अस्वस्थ करणारा आहे जेव्हा देशाला आपले सोने लंडनच्या बँकेत गहाण ठेवावे लागले होते. आज आपण त्या स्थितीपासून खूप दूर आलो आहोत आणि परकीय चलनाचा साठा ६०० अब्ज डॉलर्सच्या पलीकडे गेला आहे असा दावा वारंवार केला जातो. मात्र जेव्हा देशाचे पंतप्रधान स्वतः आयातीवर कपात करण्याच्या सूचना देऊ लागतात तेव्हा त्या दाव्यांमधील पोकळपणा उघड होऊ लागतो. जागतिक बाजारात रुपयाची घसरण रोखण्यासाठी किंवा परकीय चलन वाचवण्यासाठी आयातीवर निर्बंध लादणे हे एखाद्या गंभीर रोगावर वरवरची मलमपट्टी करण्यासारखे आहे. हे धोरणात्मक चातुर्य नसून ती एक प्रकारची आर्थिक अगतिकता आहे हे मान्य करावे लागेल. अर्थशास्त्राचा एक मूलभूत नियम असा आहे की कोणत्याही देशाचे सामर्थ्य तो जगाकडून काय विकत घेणे थांबवतो यावर ठरत नाही तर तो जगाला काय विकतो यावर ठरते. आपण ज्या वस्तूंवर आयात बंदी किंवा निर्बंध घालण्याची भाषा करतो त्यामध्ये केवळ चैनीच्या वस्तू नसतात. त्यात उद्योगांसाठी लागणारा कच्चा माल आणि अद्ययावत तंत्रज्ञानाचा समावेश असतो. जर कच्च्या मालाच्या आयातीवर आपण मर्यादा आणल्या तर त्याचा थेट फटका आपल्या उत्पादकतेला आणि पर्यायाने निर्यातीला बसतो. आजच्या जागतिक पुरवठा साखळीत कोणताही देश पूर्णपणे स्वयंपूर्ण असण्याचा दावा करू शकत नाही. अशा वेळी संरक्षणवादाची ढाल पुढे करणे हे आपल्याला पुन्हा एकदा १९७० च्या दशकातील लायसन्स राजच्या अंधाऱ्या गल्लीत घेऊन जाण्यासारखे आहे. आपल्या परकीय चलनाच्या साठ्याचे स्वरूप समजून घेणे येथे आवश्यक ठरते. आपला हा साठा प्रामुख्याने परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांच्या लहरीपणावर आणि त्यांनी केलेल्या अल्पकालीन गुंतवणुकीवर उभा आहे. तो चीन किंवा तैवानप्रमाणे वस्तूंची प्रचंड निर्यात करून कमावलेला नफा नाही. जेव्हा अमेरिकेतील फेडरल रिझर्व्ह व्याजाचे दर वाढवते तेव्हा आपल्याकडील डॉलर वेगाने बाहेर पळू लागतात. अशा वेळी आपली अर्थव्यवस्था ओलीस धरली जाते. आयात कपातीचा मार्ग पत्करून रुपया सावरण्याचा प्रयत्न करणे म्हणजे धरणाला पडलेल्या भगदाडावर बोट ठेवून पाणी रोखण्याचा बालिश प्रयत्न करण्यासारखे आहे. मूळ प्रश्न आपली निर्यात का वाढत नाही आणि आपण जागतिक दर्जाच्या वस्तू का निर्माण करू शकत नाही हा आहे. जेव्हा तुम्ही स्थानिक उद्योजकांना परकीय स्पर्धेपासून कृत्रिम संरक्षण देता तेव्हा त्यांच्यातील नावीन्य शोधण्याची वृत्ती मरून जाते. परिणामी देशाला दर्जाहीन आणि महागड्या वस्तूंचा स्वीकार करावा लागतो. भारताने हा प्रयोग याआधी अनेक दशके करून पाहिला आहे आणि त्याचे अत्यंत विघातक परिणाम आपण भोगले आहेत. आता पुन्हा त्याच वाटेवर जाणे म्हणजे इतिहासातील चुकांपासून कोणताही धडा न घेण्यासारखे आहे. आत्मनिर्भर होणे म्हणजे जगापासून तुटणे नव्हे तर जगाला जे हवे आहे ते आपल्या भूमीत सर्वोत्तम दर्जासह तयार करणे होय. उर्जेच्या आघाडीवर आपली अवस्था आजही दयनीय आहे. आपण खनिज तेलाच्या आयातीवर परकीय चलनाचा मोठा हिस्सा खर्च करतो. मात्र देशांतर्गत तेल उत्खननाच्या बाबतीत आपली नोकरशाही आणि धोरणे कमालीची सुस्त आहेत. सौर आणि पवन उर्जेच्या घोषणा करणे सोपे असले तरी औद्योगिक चाके फिरवण्यासाठी लागणारे जीवाश्म इंधन आपल्याला आयातच करावे लागते. अशा स्थितीत केवळ आयातीवर नियंत्रण आणण्यापेक्षा आपली उत्पादन क्षमता कशी वाढेल आणि लाल फितीचा कारभार कसा संपेल यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. पण दुर्दैवाने आपण मूळ व्याधीला सोडून लक्षणांवर उपचार करण्यात धन्यता मानत आहोत. शेवटी परकीय चलनाचा साठा हा तुमच्या धोरणांच्या सातत्याचा आणि आर्थिक प्रगल्भतेचा विजय असतो. आपण आयातीवर निर्बंधांचे जुनेच गंजलेले शस्त्र परजणार असू तर आपण जागतिक व्यापारात स्वतःचे स्थान धोक्यात आणत आहोत. ज्या देशाची बाजारपेठ मोठी असते त्याला जगाशी व्यापार करावाच लागतो आणि आयात ही अपरिहार्य असते. तिजोरीचा तळ दिसू नये म्हणून जगाकडे पाठ फिरवण्यापेक्षा जगाला आपली गरज वाटेल अशी उत्पादकता निर्माण करणे हाच खरा स्वावलंबनाचा मार्ग आहे. अन्यथा आपण केवळ संकटाच्या सावटाखाली जगणारे आणि तात्पुरत्या मलमपट्टीवर अवलंबून राहणारे एक कमकुवत राष्ट्र बनून राहू. ही वेळ कपातीची नसून क्षमता विस्ताराची आहे.

# तामिळनाडूत 'अम्मा'च्या चळवळीला घरघर!

तामिळनाडूच्या राजकारणात गेल्या पाच-सहा दशकांपासून अण्णा द्रमुक आणि द्रमुक या दोनच ध्रुवांभोवती सत्तेचे चक्र फिरत राहिले. मात्र, २०२६ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी या जुन्या आणि प्रस्थापित समीकरणांच्या चिंधड्या उडवल्या आहेत. अभिनेता विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कळघम' पक्षाने केवळ सत्ता काबीज केली नाही, तर प्रस्थापित पक्षांना अशा वळणावर आणून ठेवले आहे, जिथे अस्तित्वाची लढाई आता त्यांच्या 'ड्रॉइंग रूम'मध्ये सुरू झाली आहे. अण्णा द्रमुकचे सरचिटणीस एडप्पाडी पलानीस्वामी यांच्या वाढदिवसाच्या दिवशीच पक्षाचे दोन तुकडे होणे, हा केवळ राजकीय योगायोग नाही; तर ती पलानीस्वामींच्या नेतृत्वावर लागलेली एक 'कलंकित मोहोर' आहे.



मुळात, जेव्हा एखादा राजकीय पक्ष विचारधारेपेक्षा 'सत्तेच्या सोयी'ला महत्त्व देऊ लागतो, तेव्हा त्याचे रूपांतर एका विस्कळीत जमावात होणे अटळ असते. अण्णा द्रमुकच्या बाबतीत नेमके हेच घडले आहे. एस. पी. वेलुमणी आणि सी. व्ही. षणमुगम यांच्या नेतृत्वाखालील ३० हून अधिक आमदारांच्या बंडखोर गटाने थेट विजय यांच्या सरकारमध्ये सामील होण्याचा मार्ग निवडला आहे. ज्या पक्षाची स्थापनाच मुळी 'द्रमुक' विरोधाच्या आणि स्वाभिमानाच्या पायावर झाली होती, त्या पक्षाचे तथाकथित शिलेदार आज सत्तेच्या हव्यासापोटी एका नवख्या राजकीय प्रयोगाच्या पालखीचे भोई बनले आहेत, यातच सर्व आले.

या बंडाचा चेहरा जरी वेलुमणी असले, तरी यामागची प्रेरणा 'सत्ताविहीनता' हीच आहे. अण्णा द्रमुकच्या या आमदारांना आता विरोधी पक्षात बसून जनतेचे प्रश्न सोडवण्यापेक्षा सत्तेचा उबदार सोफा अधिक खुणावत आहे. "सत्तेची चटक लागलेल्यांना तत्त्वांच्या गप्पा केवळ मतदानापुरत्याच सुचतात", हेच यातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. पलानीस्वामी यांनी द्रमुकशी हातमिळवणी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप बंडखोर करत असले, तरी तो केवळ स्वतःच्या 'बदफैली' राजकारणावर पांघरूण घालण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे.

या फुटीमुळे पलानीस्वामींची अवस्था आता ओ. पन्नीरसेल्वम यांच्यासारखीच झाली आहे. ज्यांना त्यांनी एकेकाळी अकार्यक्षम ठरवून बाजूला सारले होते, आज त्याच नियतीने पलानीस्वामींना राजकीय एकांतात ढकलले आहे. तामिळनाडूच्या राजकारणातील हा 'रिसॉर्ट पॉलिटिक्स'चा पुढचा अध्याय आता सत्तेच्या वाटणीपर्यंत पोहोचला आहे. विजय यांच्यासाठी हा पाठिंबा म्हणजे 'दुधशर्करा योग' ठरला आहे. १०८ जागा जिंकून बहुमताच्या जादूई आकड्यापासून दूर राहिलेल्या विजय यांना या बंडखोर गटामुळे आता विधानसभेत 'स्थिर' म्हणता येईल असे सरकार चालवता येईल. मात्र, ज्यांनी स्वतःचा मातृपक्ष फोडला, ते उद्या विजय यांच्याही पक्षाला 'सुरुंग' लावणार नाहीत कशावरून?

> » तामिळनाडूच्या राजकारणात झालेली अण्णा द्रमुकची शकले ही एका पक्षाची फूट नाही; तर ती जयललिता यांनी रक्ताचे पाणी करून उभ्या केलेल्या एका सामर्थ्यशाली द्रविडियन चळवळीच्या अस्तंगततेची नांदी आहे.

तामिळनाडूच्या राजकारणात आता 'विजय मॉडेल'चा उदय झाला असला, तरी अण्णा द्रमुकच्या विसर्जनाची प्रक्रिया यामुळे वेगवान झाली आहे. सत्तेसाठी 'अम्मा'च्या वारशाचा लिलाव मांडणे हे मतदारांना नक्कीच रुचणारे नाही.

द्रविडियन राजकारणातील ही स्थित्यंतरे केवळ एका राज्यापुरती मर्यादित नाहीत, तर त्यातून प्रादेशिक पक्षांच्या ठिसूळ होत चाललेल्या संघटनात्मक बांधणीचे दर्शन घडते. पलानीस्वामींची राजकीय अस्तंगतता हा एका युगाचा अंत आहे की नव्या गोंधळाची सुरुवात, हे लवकरच स्पष्ट होईल. पण सध्या तरी, तामिळनाडूच्या राजकीय पटलावर 'तत्त्वनिष्ठा' हा शब्द हरवला असून 'संधीसाधूपणा' हाच एकमेव निश्चित नियम उरला आहे.

# सोसायट्यांतील झाडांच्या छाटणीसाठी विशेष धोरण

## ताथवडे-वाकड वाहतूक कोंडीवर 'फ्री लेफ्ट', रस्ते रुंदीकरणासह धडक निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये झाडांच्या छाटणीसाठी महापालिकेमार्फत स्वतंत्र विशेष धोरण तयार करण्यात येणार असल्याची माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली. या निर्णयामुळे झाडांच्या छाटणीचा आर्थिक भार सोसायट्या आणि नागरिकांवर पडणार नसल्याने लाखो रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.




शहरातील पायाभूत सुविधा, वाहतूक कोंडी, पर्यावरण आणि नागरी सुविधांबाबत सोमवारी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, उपायुक्त अण्णा बोदडे, शहर अभियंता मनोज सेठीया, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता प्रमोद ओंभासे, बापू गायकवाड, प्रेरणा सिनकर, अजय सूर्यवंशी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सध्या महापालिकेकडून केवळ सार्वजनिक जागांवरील झाडांची छाटणी केली जाते. मात्र, खाजगी सोसायट्यांतील झाडांसाठी कोणतीही आर्थिक किंवा प्रशासकीय तरतूद नसल्याने सोसायट्यांना मोठा खर्च सहन करावा लागत होता. नव्या धोरणामुळे नागरिकांना या खर्चातून दिलासा मिळणार आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने निर्माणाधीन रस्त्यांच्या कामांमध्ये प्रत्येक दोन वीज खांबांदरम्यान किमान एक झाड लावणे बंधनकारक करण्याच्या सूचनाही आमदार जगताप यांनी दिल्या.

रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्लांटमुळे होणाऱ्या वायुप्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी पीसीएमसी, पीएमसी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हाधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले. आरएमसीसाठी तयार करण्यात आलेल्या एसओपीचे उल्लंघन केल्याप्रकरणी १५० बांधकाम व्यावसायिकांना नोटिसा बजावण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. यापुढे पर्यावरण मंजुरीच्या अटींमध्ये आरएमसी नियमांचा समावेश करण्याची सूचनाही आमदारांनी केली.

ताथवडे-वाकड परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी कस्पटे वस्ती रस्ता रुंदीकरणासह महत्त्वाच्या चौकांमध्ये 'फ्री लेफ्ट' मार्ग मोकळे करण्याचे आदेश देण्यात आले. पिंपळे सौदागर येथील स्वराज्य चौक अंडरपास आणि पीके चौक उड्डाणपुलासाठी निधीची तरतूद तातडीने करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

कल्पतरू चौक, आरके चौक आणि सांगवी फाटा येथे 'अर्बन स्ट्रीट' आणि स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या फुटपाथची रुंदी कमी करून रस्ते रुंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाहतूक कोंडी आणि अपघातप्रवण ठिकाणांवर उपाययोजना करण्यासाठी वाहतूक पोलीस आणि महापालिका प्रशासनाची संयुक्त बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली.

# स्वच्छ पिंपरी-चिंचवडसाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहराला स्वच्छतेत देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले. स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत नागरिकांचा अभिप्राय हा शहर विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी नागरिकांचे मत महत्त्वाची भूमिका बजावते. प्रशासनाच्या प्रयत्नांना साथ देत प्रत्येक नागरिकाने आपला अभिप्राय नोंदवणे ही सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर तसेच महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनीही नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. "मी माझा अभिप्राय नोंदवला आहे, आपणही जरूर नोंदवा," असे सांगत महापौर लांडगे यांनी नागरिकांना पुढाकार घेण्याचे आवाहन केले. नागरिकांना स्वच्छ सर्वेक्षण अभिप्राय संकेतस्थळ येथे जाऊन आपला अभिप्राय नोंदवता येणार आहे. पिंपरी-चिंचवडला स्वच्छतेत देशात अग्रक्रम मिळवून देण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत, असेही महापौरांनी नमूद केले.

# माहिती अधिकार कायदा हे प्रभावी शस्त्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** प्रशासनातील भ्रष्टाचार आणि अनागोंदीला आळा घालण्यासाठी 'माहिती अधिकार कायदा २००५' हे सर्वसामान्य नागरिकांच्या हातातील प्रभावी शस्त्र असल्याचे प्रतिपादन सहकारतज्ज्ञ ॲड. अजित बोराडे यांनी केले. प्रशासनात पारदर्शकता आणण्यासाठी नागरिकांनी माहिती अधिकार कायद्याचा प्रभावी वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.




दक्ष नागरिक संघाच्या वतीने चिंचवड येथे रविवारी आयोजित माहिती अधिकार कार्यकर्त्यांचा महामेळावा आणि पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास कामगार नेते इरफान सय्यद, नगरसेविका सुप्रिया चांदगुडे, पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, नगरसेवक राजू बनसोडे, युवा सेनेचे निलेश हाके, ॲड. श्वेता मांडे-वैद्य, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर नागरगोजे, शांताराम कुंभार, पत्रकार सुरज साळवे, काशिनाथ शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते संजीवन सांगळे यांना 'सहकार भूषण', डॉ. सोनाली गेडाम-नागदेवते यांना 'विद्यारत्न', तर पत्रकार सुरज साळवे यांना 'पत्रकारिता भूषण' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

ॲड. बोराडे म्हणाले की, स्वातंत्र्यानंतरही प्रशासकीय यंत्रणेचा दृष्टिकोन फारसा बदललेला नाही. सुशिक्षित नागरिकांनाही शासकीय कामांसाठी अनेक महिने कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागतात, तर अशिक्षित नागरिकांची अवस्था अधिक कठीण असते. माहिती अधिकार कायद्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व वाढते आणि त्यांच्या चुकीच्या निर्णयांवर प्रकाश पडतो. माहिती अधिकार कायद्यांतर्गत केवळ कागदपत्रेच नव्हे, तर शासकीय कामांमध्ये वापरले जाणारे साहित्य, रस्ते बांधणीतील सिमेंट, वाळू तसेच औषधांचे नमुने घेण्याचाही अधिकार नागरिकांना असल्याची माहिती त्यांनी दिली. संबंधित कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष फाईल तपासणी करण्याची तरतूद असून पहिल्या तासासाठी ही सेवा मोफत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. श्वेता मांडे-वैद्य यांनी केले. विनोद क्षीरसागर यांनी प्रस्ताविक, तर निलेश हाके यांनी आभार प्रदर्शन केले.

# विश्वासघातातून घरफोडी; साडेचार लाखांचे दागिने चोरीला

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पुणे :** दिघी परिसरात विश्वासाने दिलेल्या घराच्या चावीचा गैरवापर करून आरोपीने घरफोडी करत सुमारे साडेचार लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी दिघी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मनीषा दिपक हिरवळे (वय ३८, रा. शिवनंदन पार्क, गणेशनगर, बोपखेल) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार अवतार सिंहवीर सिंह सोहल (मूळ रा. जालंधर, पंजाब) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी यांनी विश्वासाने घराची चावी आरोपीकडे दिली होती. दरम्यान, फिर्यादी कोल्हापूर येथे गेल्या असताना आरोपीने त्यांना दूरध्वनीवरून शिवीगाळ करत धमक्या दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. "तुला पंजाबपर्यंत येण्यास भाग पाडेन," अशी धमकी आरोपीने दिल्याचा आरोप आहे. त्यानंतर आरोपीने घराचे लॉक उघडून घरातील १४ तोळे ९ ग्रॅम वजनाचे सुमारे ४ लाख ४७ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५, ३१६(२) आणि ३५१(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक रहाणे करीत आहेत.

### कौटुंबिक वादातून हल्ला

**पुणे :** चिखली परिसरातील तळवडे येथे कौटुंबिक वादातून पत्नी आणि मुलावर हल्ला केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना इंद्रायणी हौसिंग सोसायटी परिसरात घडली. याप्रकरणी मानसी सुभाष उत्तेकर (वय ४०) यांनी चिखली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार सुभाष केशव उत्तेकर (वय ४५, रा. गायकवाड बिल्डिंग, रूम क्रमांक १, इंद्रायणी हौसिंग सोसायटी, रुपीनगर, तळवडे) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १० मे २०२६ रोजी मध्यरात्री आरोपी मद्यधुंद अवस्थेत घरी आला. त्यावेळी घरातील वाद वाढल्यानंतर फिर्यादी यांनी घरातील दिवे बंद करून आरोपीला झोपण्यास सांगितले. याचा राग आल्याने आरोपीने पत्नीला मारहाण करत शिवीगाळ केली. तसेच घरातील वस्तूने वार करून तिला दुखापत केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यावेळी मुलगा ज्ञानेश्वर यालाही आरोपीने मारहाण केली. या मारहाणीत त्याच्या हनुवटी, खांदा, गळा आणि हाताला दुखापत झाली. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ११८(२), ११८(१), ११५(२) आणि ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक देवकर करीत आहेत.

### कोयते बाळगणाऱ्या तिघांविरोधात गुन्हा

**पुणे:** दिघी पोलिसांनी विनापरवाना धारदार शस्त्रे बाळगणाऱ्या तिघांविरोधात कारवाई करत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी महाराष्ट्र पोलीस अधिनियम तसेच भारतीय शस्त्र अधिनियमांतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ९ मे २०२६ रोजी पहाटे सुमारे १.४० वाजण्याच्या सुमारास वाघेश्वर विद्यालयाजवळ, साठे वस्ती, कोतवालवाडी, चऱ्होली परिसरात ही कारवाई करण्यात आली.

कारवाईदरम्यान पोलिसांनी संशयितांकडून सुमारे ८०० रुपये किमतीचे दोन लोखंडी कोयते जप्त केले. याप्रकरणी बाबाजी मारुती जाधव, पोलीस शिपाई, दिघी पोलिस ठाणे यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार वाघेश्वर कृष्णा रसाळ (वय १९), अथर्व तानाजी शिंदे आणि कृष्णा वाघोले यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस आयुक्तांनी जारी केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करून आरोपी धारदार शस्त्रे बाळगत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

# भाडेकरूंची माहिती न दिल्याने घरमालकांवर गुन्हे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तळेगाव दाभाडे :** तळेगाव दाभाडे पोलिस ठाण्याच्या हद्दीतील विविध गृहनिर्माण सोसायट्यांमधील भाडेकरूंची माहिती पोलिसांना न दिल्याप्रकरणी चार घरमालकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

इंद्रपुरी कॉलनी, हॅप्पी सिटी सोसायटी आणि भक्ती माधव अपार्टमेंट येथील फ्लॅटधारकांनी भाडेकरूंची माहिती संबंधित पोलिस ठाण्यात जमा केली नव्हती. त्यामुळे पोलिसांनी संबंधित घरमालकांवर कारवाई केली आहे. घर भाड्याने देण्यापूर्वी भाडेकरूंची पार्श्वभूमी तपासणे आणि त्यांची पोलिस पडताळणी करणे सर्व घरमालकांसाठी बंधनकारक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

देशविघातक कारवाया किंवा इतर राज्यांतील गुन्ह्यांमध्ये फरार असलेले आरोपी भाडेकरू म्हणून वास्तव्य करत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रत्येक भाडेकरूची माहिती संबंधित पोलिस ठाण्यात तातडीने जमा करावी, असे निर्देश पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने दिले आहेत. भाडेकरूंची माहिती उपलब्ध झाल्यास गुन्हेगारांचा शोध घेण्यास मदत होते, असे पोलिसांनी नमूद केले. तसेच भाडेकरूसोबत लेखी भाडेकरार करणेही बंधनकारक आहे.

या प्रक्रियेचा पाठपुरावा करणे ही संबंधित गृहनिर्माण सोसायटीच्या संचालक मंडळाची नैतिक जबाबदारी असल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले. भविष्यात संपर्क साधता यावा यासाठी प्रत्येक भाडेकरूकडून पर्यायी दूरध्वनी क्रमांक घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### फुरसुंगीतील तरुणाची सायबर फसवणूक

**पुणे :** "दररोज काही मिनिटे काम करा आणि हजारो रुपये कमवा" अशा आकर्षक जाहिरातींच्या आमिषाला बळी पडून फुरसुंगी येथील एका तरुणाची तब्बल ११ लाख १७ हजार रुपयांची सायबर फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. व्हॉट्सअ‍ॅप, टेलिग्राम आणि बनावट वेबसाईटच्या माध्यमातून सायबर भामट्यांनी ही फसवणूक केल्याने शहरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून "काव्या शर्मा", "अस्मिता गणेश" आणि "लक्षण कुक्रेजा" या नावांचा वापर करणाऱ्या अज्ञात आरोपींचा शोध सुरू आहे.

फसवणुकीचा बळी ठरलेले अनिकेत अरविंद वाघिरे (वय ३२, रा. सूर्यवंशी कॉलनी, भेकराईनगर, फुरसुंगी) हे विमाननगर येथील खासगी कंपनीत नोकरी करतात. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २१ फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांच्या मोबाईलवर एका महिलेचा व्हॉट्सअ‍ॅप संदेश आला. "गुगल मॅपवर हॉटेल्सना रिव्ह्यू द्या आणि पैसे कमवा," असे सांगत त्यांना एक लिंक पाठवण्यात आली. सुरुवातीला त्यांना काही साधे टास्क देण्यात आले. संबंधित हॉटेल्सना रेटिंग आणि रिव्ह्यू दिल्यानंतर त्यांच्या खात्यावर प्रथम १५० रुपये आणि नंतर प्रत्येक टास्कमागे ५० रुपये जमा करण्यात आले. त्यामुळे अनिकेत यांचा संबंधितांवर विश्वास बसला. यानंतर आरोपींनी त्यांना टेलिग्राम अ‍ॅप डाउनलोड करण्यास सांगितले. "अस्मिता गणेश" नावाच्या महिलेने त्यांना विविध ग्रुपमध्ये समाविष्ट केले. एका ग्रुपमध्ये "लक्षण कुक्रेजा" नावाच्या व्यक्तीने "प्रिपेड टास्क"ची ऑफर दिली. "मोठा नफा", "व्हीआयपी टास्क" आणि "टास्क अपग्रेड"च्या नावाखाली आरोपींनी वेगवेगळ्या बँक खात्यांवर पैसे पाठवण्यास भाग पाडले. त्यानंतर लाखो रुपयांचे व्यवहार सुरू झाले. विविध कारणे देत आरोपींनी वारंवार पैसे उकळले. मार्च २०२४ मध्ये त्यांनी तब्बल ११ लाख १७ हजार रुपये गमावल्याचे लक्षात आले.

## ग्रामीण खेळाडूंना दर्जेदार सुविधा; दिलीप वळसे पाटील यांचे प्रतिपादन

# आधुनिक सुविधांसाठी 3 कोटींचा निधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** येथील क्रीडा संकुलात आधुनिक सुविधा उपलब्ध करून स्थानिक खेळाडूंना दर्जेदार क्रीडा वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार असल्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सांगितले. या सुविधांमुळे भविष्यात आंबेगाव तालुक्यातील खेळाडूंना मोठा फायदा होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मंचर येथे आंबेगाव तालुका क्रीडा संकुल समितीची बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत क्रीडा संकुलाच्या विकासासंदर्भातील विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाकडून प्राप्त झालेल्या सुमारे ३ कोटी रुपयांच्या निधीतून क्रीडा संकुलातील विविध विकासकामे हाती घेण्यात येणार असल्याची



माहिती यावेळी देण्यात आली. बैठकीत ४०० मीटर धावपट्टीचे अद्ययावतीकरण, बॅडमिंटन हॉलचे नूतनीकरण, लाकडी कोर्टाची उभारणी तसेच इमारतीच्या दुरुस्तीच्या कामांचा आढावा घेण्यात आला. ही सर्व कामे गुणवत्तापूर्ण आणि जलद गतीने पूर्ण करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. खेळाडूंसाठी सुविधा वाढविण्याच्या दृष्टीने कबड्डी हॉलवर पत्र्याचे शेड उभारणे, बास्केटबॉल कोर्टाचे नूतनीकरण तसेच व्यायामशाळेसाठी आधुनिक साहित्य खरेदी करण्याच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. याशिवाय जलतरण तलाव आणि संकुलातील वृक्षसंवर्धनासाठी स्वतंत्र बोअरवेल घेण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. संकुलातील विद्युतीकरणाच्या कामाचाही आराखडा निश्चित करण्यात आला. यावेळी दिलीप वळसे पाटील यांनी ग्रामीण भागातील खेळाडूंना अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी अशा आधुनिक सुविधा अत्यंत आवश्यक असल्याचे नमूद केले. दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध झाल्यास तालुक्यातील अनेक खेळाडूंना राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर चमक दाखविण्याची संधी मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीस मंचर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष लक्ष्मण थोरात, शरद सहकारी बँकेचे संचालक अजय घुले, राहुल पडवळ, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, तालुका क्रीडा अधिकारी शोभा पालवे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सूर्यकांत कुंभार, पोलिस उपनिरीक्षक सनील धनवे, गटशिक्षण अधिकारी रूपाली धोका तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

## पाणीटंचाई रोखण्यासाठी जिल्हा परिषद सज्ज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** वाढत्या उन्हाच्या तीव्रतेच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी पुणे जिल्हा परिषद प्रशासनाने व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी सोमवारी संभाव्य पाणीटंचाईचा आढावा घेत विविध उपाययोजनांना मंजुरी दिली.

सन २०२५-२६ या कालावधीसाठी तब्बल ३५ कोटी ६४ लाख ४० हजार रुपयांचा त्रैमासिक टंचाई निवारण आराखडा तयार करण्यात आला असून ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. हा आराखडा १ ऑक्टोबर २०२५ ते ३० जून २०२६ या कालावधीत तीन टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. त्यानुसार १ ऑक्टोबर ते ८ डिसेंबर २०२५, १ जानेवारी ते ३१ मार्च २०२६ आणि १ एप्रिल ते ३० जून २०२६ या कालखंडात विविध उपाययोजना करण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांनंतर नव्याने निवडून आलेल्या सदस्यांनी ग्रामीण भागातील पाणी समस्येवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. त्यानुसार हा पुरवणी टंचाई आराखडा तयार करण्यात आला आहे.

आराखड्यात जलस्रोतांची उपलब्धता वाढविण्यावर सर्वाधिक भर देण्यात आला आहे. नव्या विंधनविहिरी आणि कूपनलिका घेण्यासाठी १०१५.२५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नळ पाणीपुरवठा योजनांच्या विशेष दुरुस्तीसाठी १२२१.५१ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. तसेच विंधन विहिरींच्या दुरुस्तीसाठी १४०.१७ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे पाणीपुरवठ्यासाठी १४४.५० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून खासगी विहिरी अधिग्रहित करण्यासाठीही तरतूद आहे.

## गतीरोधकांचे खिळे ठरतायत धोकादायक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** भवानीनगर ते शेटफळगडे (ता. इंदापूर) मार्गावरील रबरी गतीरोधक निघून गेल्याने रस्त्यात लोखंडी खिळे बाहेर आले आहेत. या खिळ्यांमुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे टायर फुटण्याच्या घटना वाढल्या असून अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित गतीरोधक आणि खिळे तातडीने हटवावेत, अशी मागणी वाहनचालकांकडून करण्यात येत आहे.

भवानीनगर ते शेटफळगडे हा सुमारे १९ किलोमीटरचा रस्ता असून या मार्गावर भवानीनगर, निंबोडी, लाकडी, निरगुडे, सोनवणे वस्ती आणि शेटफळगडे या गावांचा समावेश आहे. या रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम गेल्या तीन ते चार वर्षांपासून सुरू आहे. निंबोडी ते शेटफळगडे या टप्प्यातील काम पूर्ण झाले असले तरी भवानीनगर ते निंबोडी दरम्यान काही कामे अद्याप अपूर्ण आहेत.

या मार्गावर सुमारे ३० ठिकाणी गतीरोधक बसवण्यात आले आहेत.



यातील बहुतांश गतीरोधक रबरी स्वरूपाचे असून ते बसवण्यासाठी काँक्रिट रस्त्यात मोठे लोखंडी खिळे ठोकण्यात आले होते. मात्र, लाकडी आणि निरगुडे परिसरातील अनेक रबरी गतीरोधक निघून गेल्याने हे खिळे उघडे पडले आहेत.

रस्त्याचे काँक्रिटीकरण झाल्यानंतर वाहनांचा वेग वाढला असून भरधाव वाहनांचे टायर या खिळ्यांवरून गेल्यानंतर पंचर किंवा फुटत असल्याच्या घटना घडत आहेत. अनेक वेळा वाहनचालकांच्या लक्षात न आल्याने अपघात होण्याचाही धोका निर्माण झाला आहे. भवानीनगर येथील गणेश पवार, तुषार निंबाळकर आणि शिवम सपकळ यांच्या चारचाकी वाहनांचे टायर अलीकडेच या खिळ्यांमुळे फुटल्याची माहिती समोर आली आहे. याशिवाय अनेक दुचाकी आणि चारचाकी वाहनांचे नुकसान झाल्याचे वाहनचालकांनी सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने धोकादायक रबरी गतीरोधक हटवून रस्त्यातील लोखंडी खिळे काढावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. तसेच या खिळ्यांमुळे वाहनांचे नुकसान झालेल्या वाहनधारकांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी गणेश पवार यांनी केली आहे

# पिंपळगाव जोगाच्या कालव्याला भगदाड

## शेतकऱ्यांच्या पिकांसह शेततळे आणि मोटारींचे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोगा धरणाच्या कालव्याला मंगळवारी (दि. १२) मध्यरात्री अचानक भगदाड पडल्याने मोठ्या प्रमाणावर पाणीगळती झाली. या घटनेत अनेक शेतकऱ्यांच्या पिकांसह शेततळे, विहिरी आणि विद्युत मोटारींचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या सतर्कतेमुळे पुढील संभाव्य मोठा धोका टळल्याचे सांगण्यात आले.

पिंपळगाव जोगा धरणातून सुरू असलेल्या उन्हाळी आवर्तनादरम्यान ही घटना घडली. शेतकऱ्यांनी तातडीने कुकडी पाटबंधारे विभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांनीच पुढाकार घेत कालव्यातून सोडण्यात आलेले पाणी बंद केले. पिंपळगाव जोगा धरणातून तिसरे आणि अंतिम उन्हाळी आवर्तन



दि. २० एप्रिलपासून सुरू करण्यात आले होते. सुरुवातीला ५० क्युसेकने पाणी सोडण्यात आले होते. त्यानंतर प्रत्येक सहा तासांनी ५० क्युसेकने पाण्याचा प्रवाह वाढवत दि. २३ एप्रिल रोजी २५० क्युसेक क्षमतेने पाणी सोडण्यात आले.

दरम्यान, मंगळवारी मध्यरात्री पिंपळगाव जोगा येथील सुनील बबन निमसे यांच्या शेताजवळ कालव्याला भगदाड पडले. मोठ्या आवाजामुळे सुनील निमसे यांचे बंधू संतोष निमसे जागे झाले. त्यांनी कालव्याजवळ जाऊन पाहणी केली असता कालवा फुटल्याचे निदर्शनास आले.

या दुर्घटनेत सुनील निमसे यांच्या सर्वे क्रमांक १९३ मधील साडेचार एकर क्षेत्रातील काढणीस आलेले धना आणि भुईमूग पीक पाण्याखाली गेले. तसेच त्यांचे शेततळे, विहीर आणि विद्युत मोटारी गाडल्या गेल्या. शंकर सखाराम हांडे यांच्या झेंडू आणि टोमॅटो पिकांचेही नुकसान झाले असून त्यांची विहीर आणि मोटार पाण्याखाली गेली आहे. याशिवाय आणखी आठ ते दहा शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच कुकडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर, उपअभियंता रवींद्र हांडे आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

पिंपळगाव जोगा धरण आणि कालव्याचे काम सन १९९५ मध्ये सुरू झाले होते, तर सन २००७ पासून धरणातून आवर्तन सुरू करण्यात आले. गेल्या २० वर्षांत कालव्याला अनेक ठिकाणी मोठ्या भेगा पडल्या असून अस्तरीकरण उखडले आहे.

जुन्नर तालुक्यातील ४७ किलोमीटरच्या कालवा पट्ट्यात यापूर्वीही अनेकदा कालवा फुटीच्या घटना घडल्या असून त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे कालव्याची तातडीने दुरुस्ती करून नव्याने अस्तरीकरण करण्यात यावे, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## रस्त्याच्या कामामुळे ग्रामस्थ नाराज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** अवसरी फाटा (ता. आंबेगाव) ते जांबुत (ता. शिरूर) या मार्गावरील सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम सध्या सुरू असून, या प्रकल्पासाठी राज्य शासनाकडून तब्बल ४१८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र, अवसरी-निरगुडसर परिसरातील काम संथ गतीने आणि ठेकेदाराच्या सोयीनुसार सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याचे खोदकाम करताना ज्या भागात मुबलक मुरूम उपलब्ध आहे, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात उत्खनन केले जात आहे. मात्र दोन्ही बाजूंनी समान प्रमाणात काम न करता एकाच बाजूने अधिक रस्ता उकरला जात असल्याने शेतकऱ्यांच्या जमिनींवर परिणाम होत आहे. ज्या ठिकाणी मुरूम कमी आहे, त्या भागातील काम टाळले जात असल्याचाही आरोप ग्रामस्थांनी केला



आहे.

निरगुडसर परिसरातील सुमारे दीडशे मीटर अंतराचा रस्ता अचानक चार ते पाच फूट उंच करण्यात आल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. विशेष म्हणजे या भागाच्या पुढे आणि मागे रस्त्याची पातळी पूर्ववत खाली करण्यात आली आहे. त्यामुळे नेमका हा छोटाच भाग एवढ्या उंचीवर का नेण्यात आला, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. कोणतेही नियोजन किंवा ग्रामस्थांशी चर्चा न करता रस्त्याची उंची वाढवण्यात आल्याने घरे चार ते पाच फूट खोल गेल्यासारखी दिसत आहेत. त्यामुळे नागरिकांना घरातून थेट रस्त्यावर येणे कठीण झाले असून दुचाकी आणि चारचाकी वाहने बाहेर काढताना मोठी कसरत करावी लागत आहे. चढावरून वाहन बाहेर काढताना काही नागरिक दुचाकीवरून पडल्याच्या घटनाही घडल्या आहेत. या संदर्भात नागरिकांनी सुमारे महिनाभरापूर्वी राज्याचे माजी गृहमंत्री आणि स्थानिक लोकप्रतिनिधी दिलीप वळसे पाटील यांना निवेदन दिले होते. त्यावेळी ग्रामस्थांशी चर्चा करून काम करण्याच्या सूचना संबंधित ठेकेदाराला देण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

## उन्हाच्या वाढत्या कडाक्यात मेंढपाळांच्या चिमुकल्यांचे हाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात वाढलेल्या तीव्र उष्णतेमुळे नागरिक त्रस्त झाले असून, विशेषतः तालुक्याच्या पूर्व भागात चाऱ्याच्या शोधात आलेल्या धनगर मेंढपाळांच्या कुटुंबीयांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. उन्हाळी सुट्ट्यांमुळे त्यांच्या लहान मुलांनाही शेळ्या-मेंढ्यांमागे कडक उन्हात फिरावे लागत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

आंबेगाव तालुक्याचा पूर्व भाग हा कोरडवाहू पट्ट्यात मोडत असल्याने दरवर्षी उन्हाळ्यात अहिल्यानगर जिल्ह्यासह विविध भागांतून धनगर समाजाच्या वाड्या येथे दाखल होतात. चारा आणि पाण्याच्या शोधात हे मेंढपाळ गावोगाव भ्रमंती करत असतात. यंदा तुलनेने अधिक वाड्या या भागात दाखल झाल्याचे दिसून येत आहे.

सध्या तापमानात मोठी वाढ झाली असून दुपारच्या वेळेत उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत आहे. अशा परिस्थितीत मेंढपाळांसोबत त्यांची लहान मुलेही दिवसभर शेळ्या-मेंढ्यांमागे फिरताना दिसत आहेत. डोक्यावर कडक ऊन, पायाखाली तापलेली जमीन आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई यामुळे या चिमुकल्यांचे हाल होत आहेत.

अनेक वेळा दिवसभर फिरूनही वेळेवर पाणी मिळत नसल्याने त्यांना उष्म्याचा त्रास सहन करावा लागत आहे. परिसरात हिरवा चारा जवळपास संपल्याने मेंढपाळांना अनेक किलोमीटर पायपीट करावी लागत आहे. शेतांमध्ये उरलेला चारा शोधत हे कुटुंबीय एका गावातून दुसऱ्या गावात फिरत आहेत. अनेक ठिकाणी सावलीचीही व्यवस्था नसल्याने दुपारच्या कडक उन्हातच त्यांना थांबावे लागत असल्याचे चित्र दिसत आहे.

## लोकसहभागातून फुलली वनराई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील लोणी गावात लोकसहभाग आणि श्रमदानाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धनाचा आदर्श उपक्रम राबविण्यात आला आहे. माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी, ग्रामपंचायत लोणी आणि विविध सेवाभावी संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून गावातील ओसाड माळराने हिरवाईने नटली आहेत.

माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी लोणी, ग्रामपंचायत लोणी आणि आरएमडी फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२१ ते २०२३ या कालावधीत हायस्कूल शाळेचे माळरान, वडगाव पीर रोडवरील मुक्ताई माळरान, सावता माळी मळा (नांगर तळे), पाबळ रोड परिसर आदी ठिकाणी सुमारे ४ हजार ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली असून त्यांचे संगोपन सुरू आहे.



याशिवाय माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी, ग्रामपंचायत लोणी आणि सेवाभावी संस्था '१४ ट्रीज', पुणे यांच्या वतीने गावातील गायरान क्षेत्रातील 'पाच टोळी' विभागात गतवर्षी तब्बल १० हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे.

या वृक्षलागवडीत आंबा, चिंच, लिंब, कवठ, पिंपळ आणि आवळा यांसारख्या देशी वृक्षांचा समावेश करण्यात आला आहे. भविष्यात सुमारे ४० हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.

लोणी गाव आणि परिसर अधिकाधिक हिरवागार व्हावा, हे माजी विद्यार्थी विकास प्रबोधिनी आणि ग्रामस्थांचे स्वप्न असून '१४ ट्रीज' संस्थेचे व्यवस्थापक अनंत तायडे हे वृक्षलागवड आणि संगोपनासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. ग्रामस्थांनी लावलेल्या वृक्षांची योग्य प्रकारे जोपासना केल्यामुळे झाडांची चांगली वाढ झाली असून पूर्वी ओसाड असलेली माळराने आता हिरवाईने बहरली आहेत. "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती" या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील विचारांचा लोणीकरांनी प्रत्यक्ष कृतीतून स्वीकार केल्याचे चित्र दिसून येत आहे.

## संच मान्यतेचे निकष बदलू नयेत

# कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे पुण्यात धरणे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** कनिष्ठ महाविद्यालयांच्या संच मान्यतेचे प्रचलित निकष बदलू नयेत, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या वतीने पुणे येथील शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील शिक्षक संघटनांचे अध्यक्ष आणि सरचिटणीस सहभागी झाले होते.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६



संपल्यानंतर संच मान्यतेतील विद्यमान निकष बदलण्याचा निर्णय शिक्षण संचालकांनी घेतल्याने सुमारे दहा हजार कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर महासंघाने आक्रमक भूमिका घेत आंदोलन पुकारले.

या आंदोलनात पुणे विभागाचे शिक्षक आमदार जयंत आजगावकर तसेच नाशिक विभागाचे पदवीधर आमदार सत्यजित तांबे यांनी सहभाग घेतला. शिक्षकांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असून केवळ शिक्षक संख्या कमी करण्याच्या उद्देशाने संच मान्यतेचे निकष बदलणे योग्य नसल्याचे मत आमदार सत्यजित तांबे यांनी व्यक्त केले. शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी स्वतः आंदोलनात उतरणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आमदार जयंत आजगावकर यांनी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या समस्या अकारण निर्माण केल्या जात असून संच मान्यतेत कोणताही बदल होऊ देणार नसल्याचे स्पष्ट केले. महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे म्हणाले की, सुधारित निकषांमुळे केवळ शिक्षक संख्या कमी होणार नाही, तर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानही होणार आहे. महासंघाचे समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर यांनी सांगितले की, संच मान्यतेचे विद्यमान निकष गेल्या पन्नास वर्षांपासून शासन निर्णयानुसार लागू आहेत. कोणालाही विश्वासात न घेता हे निकष गुप्तपणे बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

या आंदोलनात मुंबई, पुणे, नागपूर, सिंधुदुर्ग, चंद्रपूर, वर्धा आदी जिल्ह्यांतील सुमारे ५०० शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी राज्याचे शिक्षण आयुक्त डॉ. सत्येंद्र प्रताप सिंह यांनी आमदार आणि महासंघाच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली. बैठकीस शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर तसेच संचालक डॉ. शरद गोसावी उपस्थित होते.

## विद्याधाम प्रशालेचे दहावीच्या परीक्षेत नेत्रदीपक यश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**रांजणगाव गणपती :** विद्याधाम प्रशाला यांनी इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. दहावीच्या परीक्षेस प्रशालेचे एकूण ४३४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शाळेचा निकाल ९९.७६ टक्के लागला आहे.

प्रशालेतील विद्यार्थीनी परिजा राम मगर हिने ५०० पैकी ५०० गुण मिळवत १०० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. तसेच प्रशालेतील तीन विद्यार्थ्यांनी गणित विषयात, तर पाच विद्यार्थ्यांनी संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळवले आहेत. याशिवाय ६५ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त झाले असून २३७ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत उत्तीर्ण झाल्याची माहिती प्राचार्य गुरुदत्त पाचर्णे यांनी दिली. प्रशालेतील प्रथम पाच विद्यार्थी: परिजा राम मगर – १०० टक्के, सिद्धी संतोष गुंड – ९९.२० टक्के, श्लोक जालिंदर साबळे – ९८.८० टक्के, वैष्णवी संदीप वाघ – ९८.४० टक्के, समृद्धी भरत कारखिले – ९०.२० टक्के

यशस्वी विद्यार्थी आणि शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष धरमचंदजी फुलफगर, सचिव नंदकुमार निकम, प्राचार्य गुरुदत्त पाचर्णे, पर्यवेक्षक मच्छिंद्र बनकर, चंद्रकांत देवीकर, दिगंबर नाईक यांनी अभिनंदन केले.

## सारांश वृत्त

### मदरशात अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**जयपूर:** भिवाडी जिल्ह्यातील एका मदरशात एका मौलवीच्या मुलाने १२ वर्षीय मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप आहे, अशी माहिती पोलिसांनी मंगळवारी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशची रहिवासी असलेली पीडित मुलगी चोपंकी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ग्वाल्डा गावातील मदरशात निवासी विद्यार्थी म्हणून राहत असताना, आरोपीने २ मे आणि ७ मे अशा दोन वेगवेगळ्या प्रसंगी हा गुन्हा केला. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, जेव्हा मुलीने प्रतिकार केला, तेव्हा आरोपीने तिला धमकी दिली.

### पाणी आणि वीज संकटावरून आंदोलने

**रांची** : कथित पाणी आणि वीज संकटाच्या निषेधार्थ विरोधी पक्ष भाजपने मंगळवारी झारखंडभर आंदोलने केली, तसेच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयाबाहेर निदर्शने केली. रांचीमध्ये, भाजपचे प्रदेशाध्यक्ष आदित्य साहू यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी पाणीटंचाईचे प्रतीक म्हणून मातीची भांडी घेऊन जिल्हा शाळेच्या मैदानापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ आणि माजी मुख्यमंत्री अर्जुन मुंडा हेदेखील या आंदोलनात सहभागी झाले. आंदोलकांनी अखंड पाणी आणि वीजपुरवठ्याच्या मागणीसाठी घोषणाबाजी केली.

### शेतकऱ्यांकडून धान खरेदीचे आदेश

**हैदराबाद** : तेलंगणाचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी मंगळवारी संबंधित अधिकाऱ्यांना धान आणि इतर पिकांची खरेदी जलदगतीने करण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. शेतकऱ्यांकडून अन्नधान्य खरेदीस होणाऱ्या कथित विलंबावरून विरोधी पक्षांकडून सुरू असलेल्या आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही टिप्पणी केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांसोबत व्हिडिओ कॉन्फरन्स घेतलेल्या रेड्डी यांनी सांगितले की, शेतकऱ्यांकडून खरेदी करण्याच्या प्रक्रियेत कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही.

## बंगालमध्ये भाजपचा ऐतिहासिक विजय

# डाव्यांच्या पाठिंब्याने बदलले समीकरण

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**कोलकाता** : २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीने राज्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलून टाकली आहेत. प्रथमच भारतीय जनता पक्ष (भाजप) ने स्पष्ट बहुमत मिळवत सत्ता हस्तगत केली असून, सुवेंदू अधिकारी यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली आहेत. या निकालानंतर राज्याच्या राजकारणात डाव्या मतदारांच्या भूमिकेची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

सत्तेतून बाहेर पडलेल्या ममता बॅनर्जी यांनी भाजपविरोधात संयुक्त विरोधी आघाडी उभारण्याचे आवाहन केले होते. त्यांनी तृणमूल काँग्रेस (टीएमसी), काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी एकत्र यावे, असे म्हटले. मात्र भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) आणि इतर डाव्या पक्षांनी हा प्रस्ताव स्पष्ट शब्दांत फेटाळून लावला. ममता बॅनर्जी यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे भाजपला "सर्वात मोठा शत्रू" संबोधत विरोधी पक्षांच्या ऐक्याचे आवाहन केले होते. परंतु निवडणुकीच्या निकालांचे विश्लेषण समोर आल्यानंतर डाव्या मतदारांचा मोठा वर्ग प्रत्यक्षात भाजपच्या बाजूने गेला असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, डाव्या मतदारांच्या "मौन पाठिंब्यामुळे" भाजपला निर्णायक फायदा झाला. टीएमसी सरकारविरोधातील नाराजी आणि डाव्या पक्षांची घटती ताकद यामुळे अनेक डावे समर्थक भाजपकडे वळल्याचे मानले जात आहे. न्यू बॅरकपूरमधील सीपीआय(एम) कार्यकर्ते संजित रॉय यांनी सांगितले की, "टीएमसीला सत्तेतून दूर करण्यासाठी अनेक डाव्या समर्थकांनी भाजपला मतदान केले." भवानीपूर मतदारसंघातील विजय भाषणात सुवेंदू अधिकारी यांनीही याचा उल्लेख केला. "भवानीपूरमध्ये सीपीआय(एम) ला मिळालेल्या १३ हजार मतांपैकी किमान १० हजार मते मला मिळाली. त्या मतदारांचे मी आभार मानतो," असे त्यांनी म्हटले. दमदम उत्तर, जादवपूर, उत्तरपारा आणि आसनसोल यांसारख्या मतदारसंघांमध्येही डाव्या मतांचे भाजपकडे मोठ्या प्रमाणावर हस्तांतरण झाल्याचे दिसून आले.

२०११ मध्ये ३४ वर्षांची सत्ता गमावल्यानंतर डाव्या आघाडीची ताकद सातत्याने कमी होत गेली. सीपीआय(एम)चा मतांचा वाटा २०११ मधील ४१ टक्क्यांवरून २०२६ मध्ये केवळ ४.४ टक्क्यांवर आला आहे. २०१८ च्या पंचायत निवडणुकांदरम्यान डाव्या कार्यकर्त्यांवर झालेल्या कथित हल्ल्यांमुळे टीएमसीविरोधातील भावना अधिक तीव्र झाल्याचे सांगितले जाते. याच पार्श्वभूमीवर "एबार राम, पोरे बम" (आता भाजपला मत, पुढच्या वेळी डाव्यांना साथ) ही रणनीती डाव्या मतदारांमध्ये चर्चेत आली. टीएमसीला पराभूत करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात भाजपला पाठिंबा देण्याची भूमिका अनेकांनी स्वीकारल्याचे निरीक्षकांचे मत आहे. डाव्या मतदारांच्या या भूमिकेमागे दोन प्रमुख कारणे सांगितली जात आहेत. एक म्हणजे, टीएमसी राजवटीत डाव्या कार्यकर्त्यांवर होत असल्याचा आरोप असलेला राजकीय दबाव आणि हिंसाचार. दुसरे म्हणजे, डावे पक्ष स्वतःला टीएमसीचा प्रभावी पर्याय म्हणून उभे करू शकले नाहीत.

२९४ सदस्यीय विधानसभेत भाजपने ४५ टक्के मतांसह २०७ जागा जिंकल्या. अनेक मतदारसंघांमध्ये निसटत्या फरकाने मिळालेल्या विजयात डाव्या मतांचे हस्तांतरण निर्णायक ठरल्याचे विश्लेषण समोर आले आहे. निवडणुकांदरम्यान केंद्रीय सुरक्षा दलांची मोठ्या प्रमाणावर तैनाती करण्यात आली होती. त्यामुळे मतदारांना निर्भयपणे मतदान करता आल्याचे सांगितले जात आहे.

## देशात कोणतीही इंधनटंचाई नाही : हरदीप सिंग पुरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर देशात इंधनाचा कोणताही तुटवडा नसल्याचे आश्वासन केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी मंगळवारी दिले. आपत्कालीन उपाययोजनांचा भाग म्हणून एलपीजी उत्पादनात वाढ करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

भारतीय उद्योग परिसंघ (सीआयआय) यांच्या वार्षिक व्यवसाय शिखर परिषदेत बोलताना पुरी म्हणाले की, देशातील एलपीजी उत्पादन दररोज ३५ ते ३६ हजार टनांवरून जवळपास ५४ हजार टनांपर्यंत वाढवण्यात आले आहे. "एलपीजी पुरवठ्याबाबत कोणतीही अडचण नाही. देशाकडे सध्या ६९ दिवस पुरेल इतका कच्चे तेल आणि एलएनजीचा साठा आहे, तर एलपीजीचा ४५ दिवसांचा साठा उपलब्ध आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे जागतिक बाजारपेठेवर ताण निर्माण होत असल्याचे सांगत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनाचा उल्लेख केला. "पंतप्रधानांचे आवाहन हे केवळ सल्ला नसून संभाव्य आर्थिक ताण कमी करण्यासाठी उपाययोजनांचा विचार सुरू करण्याचा संकेत आहे," असे पुरी म्हणाले.

रविवारी हैदराबाद येथे पंतप्रधान मोदी यांनी इंधनाचा विवेकपूर्ण वापर करण्याचे आवाहन केले होते. पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करणे, मेट्रो रेल्वेचा अधिक वापर, कारपूलिंग, इलेक्ट्रिक वाहनांचा स्वीकार वाढवणे, मालवाहतुकीसाठी रेल्वेचा वापर आणि घरून काम करण्यास प्राधान्य देणे, अशा उपायांचा त्यांनी उल्लेख केला होता. परकीय चलनाची बचत करण्यासाठी नागरिकांनी काही काळ सोन्याची खरेदी आणि परदेश प्रवास टाळण्याचाही विचार करावा, असे आवाहन पंतप्रधानांनी यावेळी केले होते.

## चंद्रनाथ रथ हत्येचा तपास सीबीआयकडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगालमधील भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे वैयक्तिक सहाय्यक चंद्रनाथ रथ यांच्या हत्येचा तपास केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) कडे सोपवण्यात आला आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी सीबीआयने सात सदस्यीय विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे.

सीबीआयचे डीआयजी पंकज कुमार सिंह यांच्या नेतृत्वाखाली ही एसआयटी काम करणार आहे. पथकात पोलीस अधीक्षक सुभाष चंद्र कुंडू, अनिल कुमार यादव, उपअधीक्षक विकास पाठक, अमित कुमार, कुलदीप आणि लखनौस्थित निरीक्षक विवेक श्रीवास्तव यांचा समावेश आहे. राज्यात नुकतेच स्थापन झालेल्या भाजप सरकारने घटनेनंतर तत्काळ गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी) ला तपासाचे आदेश दिले होते. सीआयडीने प्राथमिक तपास सुरू केल्यानंतर काही तासांतच सीबीआयची एसआयटी स्थापन करण्यात आली.

बारासात येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात भेट दिल्यानंतर सुवेंदू अधिकारी यांनी राज्य पोलिसांवर विश्वास व्यक्त करत सीबीआय चौकशीची गरज नसल्याचे म्हटले होते. मात्र, नंतर तपास सीबीआयकडे देण्यात आला.

६ मे रोजी उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील मध्यमग्राम परिसरातील दोहरिया येथे चंद्रनाथ रथ यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. विधानसभेच्या निकालानंतर अवघ्या दोन दिवसांनी ही घटना घडली. रथ हे कोलकात्यातून आपल्या फ्लॅटकडे परतत असताना हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला होता. एसआयटीने रविवारी तिन्ही संशयितांना ताब्यात घेऊन अटक केली. सोमवारी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने १३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

## हिमंता बिस्वा सरमा यांचा शपथविधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**गुवाहाटी** : हिमंता बिस्वा सरमा यांनी मंगळवारी सलग दुसऱ्यांदा आसामच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. यासह राज्यात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन झाले आहे.

गुवाहाटीतील खानापारा येथील व्हेटर्नरी मैदानावर झालेल्या भव्य शपथविधी सोहळ्यात राज्यपाल लक्ष्मण प्रसाद आचार्य यांनी सरमा आणि चार आमदारांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. यावेळी रामेश्वर तेली, अजंता नेओग, अतुल बोरा आणि चरण बोरो यांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. रामेश्वर तेली आणि अजंता नेओग हे भाजपचे प्रतिनिधी आहेत, तर अतुल बोरा हे आसाम गण परिषद (एजीपी) आणि चरण बोरो हे बोडोलँड पीपल्स फ्रंट (बीपीएफ) या मित्रपक्षांचे नेते आहेत. शपथविधी सोहळ्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, तसेच एनडीएशासित राज्यांचे मुख्यमंत्री, विविध देशांचे राजदूत, उद्योगपती आणि धार्मिक नेते उपस्थित होते. सरमा यांच्या कुटुंबीयांनीही या सोहळ्याला हजेरी लावली.

शपथविधीपूर्वी सरमा यांनी 'एक्स'वर संदेश देत मा कामाख्या आणि महापुरुष श्रीमंत शंकरदेव यांच्या आशीर्वादाने आसाममध्ये शांतता, प्रगती आणि समृद्धीचे नवे पर्व सुरू होईल, असा विश्वास व्यक्त केला.

दरम्यान, अतुल बोरा यांनी एनडीएचा तिसरा कार्यकाळ हा आसामसाठी "सुवर्णकाळ" ठरेल, असे म्हटले. सोहळ्यास उपस्थित असलेल्या विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी विकासाच्या मुद्द्यावर मत दिल्याबद्दल आसामच्या जनतेचे आभार मानले आणि हा जनादेश ऐतिहासिक असल्याचे सांगितले. ईशान्य भारताच्या विकासासाठी विशेष लक्ष दिल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान मोदी यांचे कौतुक केले.

## केरळच्या मुख्यमंत्रीपदावर काँग्रेसमध्ये खल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : केरळच्या पुढील मुख्यमंत्रीपदासाठी काँग्रेसमध्ये जोरदार हालचाली सुरू असून, अंतिम नाव निश्चित करण्यासाठी दिल्लीपासून तिरुवनंतपुरमपर्यंत बैठका सुरू आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे निकटवर्तीय मानले जाणारे के. सी. वेणुगोपाल आणि केरळ विधानसभेतील माजी विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीशन हे मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीतील प्रमुख दावेदार मानले जात आहेत.

मंगळवारी दिल्लीत झालेल्या बैठकीत राहुल गांधी यांनी केरळ काँग्रेसच्या अनेक वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली. मुख्यमंत्रीपदासाठी कोणत्या नावाला पाठिंबा आहे, याबाबत त्यांनी राज्य युनिटच्या माजी अध्यक्षांची मते जाणून घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली. बुधवारी सकाळपर्यंत मुख्यमंत्रीपदाच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राहुल गांधी यांनी कन्नूरचे खासदार आणि माजी प्रदेशाध्यक्ष के. सुधाकरन, तसेच एम. एम. हसन आणि के. मुरलीधरन यांच्याशी स्वतंत्र चर्चा केली. याशिवाय काँग्रेसचे कार्याध्यक्ष पी. सी. विष्णूनाथ, शफी परंबिल आणि ए. पी. अनिल कुमार यांच्यासोबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्यमंत्रीपदासाठी वेणुगोपाल आणि सतीशन यांच्यासह काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रमेश चेन्नीथला यांचे नावही चर्चेत आहे.

## पेपरफुटी प्रकरणाची सीबीआय चौकशी

# नीट यूजी २०२६ परीक्षा रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : पेपरफुटी आणि अन्य अनियमिततांच्या आरोपांनंतर राष्ट्रीय परीक्षा संस्था राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) यांनी ३ मे रोजी झालेली नीट यूजी २०२६ परीक्षा रद्द करण्याचा निर्णय मंगळवारी जाहीर केला. ही परीक्षा नव्या तारखांना पुन्हा घेतली जाणार असून त्याबाबतची स्वतंत्र अधिसूचना लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

या प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी केंद्र सरकारने तपास केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) कडे सोपवला आहे. देशभरातील आणि परदेशातील ५४३२ केंद्रांवर परीक्षा दिलेल्या २२ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांवर या निर्णयाचा परिणाम होणार आहे. एनटीएने 'एक्स'वरील निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास कायम राखणे आणि पारदर्शकता सुनिश्चित करणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय संस्थांकडून प्राप्त माहिती आणि तपास यंत्रणांच्या प्राथमिक निष्कर्षांचा आढावा घेतल्यानंतर परीक्षा प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे संस्थेने नमूद केले. "भारत सरकारच्या मान्यतेनंतर ३ मे २०२६ रोजी झालेली नीट (यूजी) २०२६ परीक्षा रद्द करण्याचा आणि ती नव्याने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे," असे एनटीएने स्पष्ट केले. पुनर्परीक्षेच्या तारखा तसेच नव्या प्रवेशपत्रांबाबतची माहिती येत्या काही दिवसांत अधिकृत संकेतस्थळ आणि माध्यमांद्वारे जाहीर करण्यात येईल, असेही संस्थेने म्हटले आहे.

एनटीएने विद्यार्थ्यांना आणि पालकांना केवळ अधिकृत सूचनांवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले आहे. मे २०२६ सत्रातील विद्यमान नोंदणी, उमेदवारी आणि परीक्षा केंद्रांची माहिती पुनर्परीक्षेसाठी वैध राहणार असून नव्याने अर्ज करण्याची गरज भासणार नाही. अतिरिक्त परीक्षा शुल्क आकारले जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी भरलेले शुल्क परत केले जाईल, अशी माहिती संस्थेने दिली.

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी घेण्यात येणारी राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा (नीट) ३ मे रोजी पार पडली होती. एनटीएने यावेळी अभूतपूर्व सुरक्षा उपाययोजना केल्याचा दावा केला होता. प्रश्नपत्रिका जीपीएस-सक्षम वाहनांमधून वाहतूक करण्यात आल्या होत्या, तर परीक्षा केंद्रांवर एआय-सहाय्यित सीसीटीव्ही देखरेख ठेवण्यात आली होती. मात्र, राजस्थानातील सीकर येथे पेपरफुटीच्या तक्रारी समोर आल्यानंतर तपासाची जबाबदारी राजस्थान विशेष कृती गटाकडे (एसओजी) सोपवण्यात आली होती.

## सनातनवरील भूमिकेचा उदयनिधी यांचा पुनरुच्चार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : द्रमुक नेते आणि तामिळनाडू विधानसभेतील विरोधी पक्षनेते उदयनिधी स्टॅलिन यांनी मंगळवारी विधानसभेत सनातन धर्माविरोधातील आपली भूमिका पुन्हा ठामपणे मांडली. "लोकांमध्ये फूट पाडणारा सनातन धर्म निश्चितपणे रद्द केला पाहिजे," असे वक्तव्य त्यांनी सभागृहात केले.

विरोधी पक्षनेते म्हणून केलेल्या आपल्या पहिल्याच भाषणात त्यांनी सप्टेंबर २०२३ मधील वादग्रस्त वक्तव्याची पुनरावृत्ती केली. त्या विधानानंतर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या तसेच हिंदुत्ववादी संघटनांकडून त्यांच्याविरोधात विविध न्यायालयांत खटलेही दाखल करण्यात आले होते. यावेळी त्यांनी नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्यात 'तमिळ थाई वाझ्थू' या तामिळ प्रार्थना गीताला कथितरीत्या दुय्यम स्थान दिल्याबद्दल नाराजी व्यक्त केली. राष्ट्रगीताला नेहमीप्रमाणे अग्रक्रम न देता तिसऱ्या क्रमांकावर ठेवण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

"शपथविधी सोहळ्यात घडलेली घटना ही चुकीची होती. विधानसभेत अशी बाब पुन्हा घडू देऊ नये. आम्ही ते होऊ देणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला.

तामिळनाडूतील सर्व शासकीय आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये 'तमिळ थाई वाझ्थू'ला नेहमी अग्रस्थान दिले गेले पाहिजे, यावर त्यांनी भर दिला. "या परंपरेशी कोणतीही तडजोड होता कामा नये. राज्याचे हक्क आणि परंपरा जपण्यासाठी आपण सतर्क राहिले पाहिजे," असेही ते म्हणाले.

प्रोटोकॉलमधील बदलामुळे राज्यातील जनतेमध्ये संताप आणि धक्का निर्माण झाल्याचा दावा करताना त्यांनी २०२३ मध्ये राज्यपाल आर. एन. रवी यांनी प्रस्थापित परंपरांमध्ये बदल करण्याचा प्रयत्न केल्याचा उल्लेख केला. त्या वेळी तत्कालीन द्रमुक सरकारने त्याला विरोध केल्याची आठवणही त्यांनी करून दिली.

विरोधी पक्षाच्या भूमिकेबाबत बोलताना त्यांनी द्रमुकचे संस्थापक सी. एन. अण्णादुराई यांचा दाखला दिला. "विरोधी पक्ष हा वाहनाच्या ब्रेकप्रमाणे किंवा बैलाच्या लगामाप्रमाणे असतो. तो सत्तेला योग्य दिशेने ठेवण्याचे काम करतो," असे ते म्हणाले.

## जनतेला अर्थव्यवस्थेची माहिती मिळावी

**नवी दिल्ली** : 'आप'चे अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकांना पाळायला सांगितलेल्या काटकसरीच्या उपाययोजनांवरून प्रश्न उपस्थित केला आणि ते म्हणाले की, त्यांनी लोकांना देशाच्या अर्थव्यवस्थेच्या स्थितीबद्दल माहिती दिली पाहिजे. देशाने युद्धांसह अनेक संकटे अनुभवली आहेत, परंतु मोदींच्या आधी कोणत्याही पंतप्रधानाने कठोर उपाययोजना जाहीर करून लोकांना त्यांचे पालन करण्याचे आवाहन केले नव्हते, असे ते म्हणाले.

## एआयएडीएमकेचा विजयला पाठिंबा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई** : ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम मधील ज्येष्ठ आमदार एस. पी. वेलुमणी आणि सी. व्ही. षण्मुगम यांच्या नेतृत्वाखालील गटाने मंगळवारी मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांच्या नेतृत्वाखालील तामिळनाडू वेत्री कळघम सरकारला पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर केला.

षण्मुगम यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ते दुपारी मुख्यमंत्री विजय यांची भेट घेऊन सरकारला पाठिंबा देणारे पत्र सादर करणार आहेत. तसेच एआयएडीएमकेचे सरचिटणीस एडप्पाडी के. पलानीस्वामी हे द्रविड मुन्नेत्र कळघमला सरकार स्थापनेसाठी पाठिंबा देण्याच्या भूमिकेत असल्याचा आरोपही त्यांनी केला.


"द्रमुकला पराभूत करण्यासाठीच एआयएडीएमकेची स्थापना झाली होती. त्यामुळे पलानीस्वामी यांच्या निर्णयाला आम्ही विरोध केला," असे षण्मुगम म्हणाले. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत एआयएडीएमकेने ४७ जागा जिंकल्या आहेत. या गटाच्या पाठिंब्यामुळे विजय सरकारचे संख्याबळ आणखी मजबूत होणार आहे.

जेसीडी प्रभाकर यांची तामिळनाडू विधानसभेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. अध्यक्षपदाच्या निवडीसाठी बोलावण्यात आलेल्या विशेष अधिवेशनात प्रभारी अध्यक्ष एम. व्ही. करुपैया यांनी प्रभाकर हे एकमेव उमेदवार असल्याचे जाहीर केले. मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी प्रभाकर यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला होता.

## लाचखोरीप्रकरणी रीडरसह मध्यस्थ अटकेत

# पंजाब दक्षता ब्युरो मुख्यालयावर सीबीआयचा छापा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**चंदीगड** : केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) यांनी २५ लाख रुपयांच्या कथित लाचखोरीप्रकरणी मोहाली येथील पंजाब दक्षता ब्युरो मुख्यालयावर छापा टाकला असून, दक्षता ब्युरो प्रमुखांच्या रीडरसह एका कथित मध्यस्थाला अटक केली आहे. राज्याच्या भ्रष्टाचारविरोधी यंत्रणेवर केंद्रीय तपास संस्थेने टाकलेला हा पहिलाच छापा असल्याचे मानले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सीबीआयने प्रथम चंदीगडमधील सेक्टर ३५ येथील एका पंचतारांकित हॉटेलवर कारवाई केली. येथे दक्षता ब्युरोचे प्रमुख शरद सत्य चौहान यांचे रीडर निरीक्षक ओ. पी. राणा आणि कथित मध्यस्थ राघव गोयल हे एका तक्रारदारासोबत कथित व्यवहाराची चर्चा करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान राघव गोयल यांना अटक करण्यात आली, तर ओ. पी. राणा फरार झाल्याचे सांगितले जात आहे. गेल्या पाच ते सहा वर्षांपासून राणा हे चौहान यांच्यासोबत कार्यरत असल्याचे सूत्रांनी नमूद केले.

मुक्तसर जिल्ह्यातील मलोट येथील भाजप युवा मोर्चाचे नेते असलेले गोयल हे भाजप नेते गजेंद्र शेखावत यांच्या निकटवर्तीयांपैकी असल्याचे सांगितले जाते. काही दिवसांपूर्वी त्यांचे सुरक्षा कवच हटवण्यात आल्याचीही माहिती समोर आली आहे.

सीबीआयच्या लाचलुचपत प्रतिबंधक शाखेने राणा आणि गोयल यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. कारवाईदरम्यान कथित लाचेपैकी १३ लाख रुपये जप्त करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

मोहाली येथील दक्षता ब्युरो कार्यालयावर सोमवारी रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या छाप्यामध्ये किमान तीन वरिष्ठ अधिकारी चौकशीच्या फेऱ्यात सापडल्याची माहिती आहे. हा तपास निलंबित डीआयजी हरचरण सिंग भुल्लर यांच्याशी संबंधित लाचखोरी प्रकरणाशी जोडला जात आहे. भुल्लर यांना सीबीआयने गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये अटक केली होती. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, "दक्षता विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या वतीने लाच स्वीकारणाऱ्या कथित दलालांविरोधात कारवाई करण्यात आली. सुमारे २० लाख रुपयांच्या व्यवहाराची चौकशी सुरू असताना हा छापा टाकण्यात आला." या प्रकरणावरून शिरोमणी अकाली दल नेते बिक्रम सिंग मजीठिया यांनी आम आदमी पक्ष सरकारवर जोरदार टीका केली. "पंजाबमधील भ्रष्टाचार आता वरपासून खालपर्यंत उघड होत आहे," असे त्यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले. तसेच मुख्यमंत्री भगवंत मान यांच्यावरही त्यांनी निशाणा साधला.

कथित व्यवहाराचे स्वरूप आणि चौकशीखालील अधिकाऱ्यांची नावे जाहीर करण्यात आलेली नाहीत. तपास सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. पंजाब दक्षता ब्युरोच्या प्रवक्त्याने मात्र, "सीबीआयने एका खासगी व्यक्तीला ताब्यात घेतले आहे. तपासात कोणत्याही अधिकाऱ्याचे नाव समोर आल्यास ब्युरो पूर्ण सहकार्य करेल," असे स्पष्ट केले.